# समाजातील आर्थिक दरी कमी करण्याची गरज

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. गेल ऑम्वेट. सोबत डॉ. सुखदेव थोरात, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. भारत पाटणकर, डॉ. जगन कराडे,डॉ. विद्युत जोशी, डॉ. हरी बाबू, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. विलास नांदवडेकर आदी.

'समाजामध्ये निर्माण झालेली आर्थिक दरी कमी करण्यासाठी भविष्यात काय प्रयत्न केले पाहिजेत याची विचारश्रृंखला तयार होण्याची गरज आहे. यासाठी गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे. राज्यकर्त्यांच्या आणि सरकारच्या माध्यमातून समाजाची आर्थिक उन्नती होण्यासाठी निश्चित धोरण तयार करण्याची मोठी जबाबदारी ही समाजशास्त्रज्ञांची आहे,' असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागामार्फत अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून रशियन सोशिओलॉजिकल सोसायटी, साऊथ अफ्रिकन सोशिओलॉजिकल सोसायटी, एशिया क्लायमेंट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया, इंटरनॅशनल सोशिऑलॉजीकल सोसायटी आणि इंडियन सोशिऑलॉजीकल सोसायटी यांच्या सहकार्याने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये, 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी या परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ

## समाजशास्त्र परिषदेत डॉ. सुखदेव थोरात यांचे प्रतिपादन

संशोधक व मानवी हक्क कार्यकर्त्या डॉ.गेल ऑम्वेट यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के होते. यावेळी, भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डी.आर. साहू, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, सामाजिकशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता डॉ.भारती पाटील, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.पी.एस.पाटील, डॉ.भारत पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. थोरात म्हणाले, 'समाजातील गोरगरीबांपर्यंत लोकशाहीचा खरा अर्थ पोहोचला पाहिजे. मात्र आजची राजकीय लोकशाही ही समाजातील आर्थिक व सामाजिक लोकशाहीवर अवलंबून आहे. समाजातील गोरगरिबांनाही लोकशाही प्रणालीमध्ये सामावून घ्यायचे असेल तर सध्याच्या प्रणालीमध्ये योग्य तो बदल व्हायला हवा.'

याप्रसंगी भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा डॉ.आर.इंदिरा आणि भारती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.उत्तमराव भोईटे यांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेचे संचालक व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. प्रतीक्षा मांगलेकर यांनी सूत्रसंचालन केले. या परिषदेमध्ये माजी कुलगुरू डॉ.विद्युत जोशी, डॉ.हरी बाबू, हेमिक्सा राव, के.एल.शर्मा, डॉ.परमजित सिंग, डॉ.विजय खरे, डॉ.बी.के.नागला यांच्यासह इंडोनेशिया येथील डॉ.अहमद दिरवण, युफी ॲडरॅनी, स्वित्झर्लंडमधील जॅडे ग्रेस आणि चार्ले टर्नर, फिलीपाईन्समधील अर्जेल मसंदा, यांच्यासह माजी विभागप्रमुख डॉ.एस. एन.पवार, डॉ.जे.बी.आंबेकर, डॉ.आर. बी.पाटील उपस्थित होते.

## सुखदेव थोरात : शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचा प्रारंभ

# समाज पुनर्रचनेसाठी समान शिक्षण, आर्थिक संधी गरजेची

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ‘समाज पुनर्रचना’ हा एक कृती कार्यक्रम समजून त्याची पूर्तता करण्यासाठी शिक्षण आणि आर्थिक क्षेत्रात समान संधी निर्माण करणे आवश्यक आहे. त्याला शासनाने संरक्षण दिले पाहिजे. जातीयता, अस्पृश्यता, भेदभाव नष्ट केला, तरच आदर्श समाजव्यवस्था निर्माण करता येणार आहे, असे प्रतिपादन भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांनी मंगळवारी केले.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन प्रा. डॉ. सुखदेव थोरात आणि गेल ऑम्वेट यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के, भारत पाटणकर, डॉ. विलास नांदवडेकर, जगन कराडे, डॉ. पी. एस. पाटील, प्रा.डॉ. भारती पाटील, आदी उपस्थित होते.

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचे ‘समाज पुनर्रचना’ या विषयावर बीजभाषण झाले. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर मानवी हक्क कार्यकर्त्या गेल ऑम्वेट, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भारत पाटणकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, समानता, स्वातंत्र्य, समान संधी, सामाजिक न्याय, प्रतिष्ठा अशी भारतीय समाजाची उद्दिष्टे होती. राज्यघटनेत ती निर्धारित केली होती; मात्र, त्याची परिपूर्ती झालेली नाही. भारतीय समाजाची पुनर्रचना करताना संबंधित उद्दिष्टे निर्धारित करण्यासाठी नव्याने प्रयत्न करावे लागतील.

गेल ऑम्वेट म्हणाल्या, समाजाची पुनर्बांधणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला जातिनिर्मूलनाचा विचार समाजात बिंबविण्याची गरज आहे. त्यातून जातिविरहित समाजबांधणी होईल.

डॉ. शिर्के म्हणाले, समानतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्याची सध्या गरज आहे. त्यादृष्टीने ही परिषद महत्त्वपूर्ण आहे. यावेळी प्रा. प्रल्हाद माने लिखित ‘भारतातील दारिद्र्य आणि असमानता’ या पुस्तकाच्या खंड एक व दोनचे प्रकाशन झाले. यावेळी भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेच्या अध्यक्षा प्रा. आर. इंदिरा, डॉ. डी. आर. साहू, प्रा. डॉ. भारती पाटील, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. उत्तमराव भोईटे, आदींसह विविध १५ देशांमधील २५० प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. प्रतीक्षा मांगलेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.

### समाजशास्त्रज्ञांची मोठी जबाबदारी

समाजामधील गरिबांनाही लोकशाही प्रणालीमध्ये भाग घेण्यासाठी सध्याच्या प्रणालीत योग्य तो बदल गरजेचा आहे. राज्यकर्त्यांच्या आणि शासनाच्या माध्यमातून समाजाची आर्थिक उन्नती होण्यासाठी निश्चित धोरण तयार करण्याची मोठी जबाबदारी ही समाजशास्त्रज्ञांची आहे, असे मत डॉ. थोरात यांनी व्यक्त केले.

# लोकशाही प्रणालीत बदलाची गरज

## डॉ. सुखदेव थोरात : समाजशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय परिषद

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : राजकीय लोकशाही ही आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीवर अवलंबून असते. समाजातील गरिबांनाही लोकशाही प्रणालीत भाग घेण्यासाठी सध्याच्या प्रणालीत योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. परदेशांत असे बदल अवलंबिले जात आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी आज येथे केले.**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय समाजशास्त्र परिषदेला मंगळवारी प्रारंभ झाला. या वेळी गेल ऑम्वेट यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी डॉ. भारत पाटणकर, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदिवडेकर, डॉ. जगन कराडे आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागामार्फत अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्धाटन ज्येष्ठ संशोधक प्रा.गेल ऑम्वेट यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. परिषदेचे संचालक व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रतिक्षा मांगलेकर यांनी सुत्रसंचलन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के होते. याप्रसंगी डॉ.थोरात म्हणाले, 'समाजामध्ये समानता मिळविण्याच्या प्रयत्नांमध्ये प्रत्येकास समान संधी आहे. त्यासाठी समान अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्ये समानता आणि स्वातंत्र्य याबाबत अगदी स्पष्टपणे लिहिलेले आहे. त्यामुळे समान नागरी हक्क, राजकीय अधिकार, मूलभूत अधिकर लोकांना देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समाजामध्ये निर्माण झालेली आर्थिक दरी कमी करण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत, यासाठी गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे. राज्यकर्त्यांच्या आणि शासनाच्या माध्यमातून समाजाची आर्थिक उन्नती होण्यासाठी निश्‍चित धोरण तयार करण्याची मोठी जबाबदारी ही समाजशास्त्रज्ञांची आहे.' याप्रसंगी ज्येष्ठ संशोधक व मानवी हक्क कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्वेट, भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा डॉ.आर.इंदिरा आणि भारती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.उत्तमराव भोईटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. या परिषदेमध्ये यावेळी, भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डी.आर.साहू, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सामाजिकशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता डॉ.भारती पाटील, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.पी.एस.पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ.भारत पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी कुलगुरू डॉ.विद्युत जोशी, डॉ.हरी बाबू, हेमिक्सा राव, के.एल. शर्मा, डॉ.परमजित सिंग, डॉ.विजय खरे, डॉ.बी.के.नागला यांचेसह इंडोनेशियायेथील डॉ.अहमद दिरवण, युफी ×डरॅनी, स्विझर्लंडमधील जॅडे ग्रेस आणि चार्ले टर्नर, फिलीपाईन्समधील अर्जेल मसंदा, साऊथ कोरियामधील जॉग, दक्षिण अफ्रिका येथील जयंथन गावेंडर, किरण ओढाव आणि सायमन मॅपडाईग यांसह देशभरातून आलेले ज्येष्ठ सामाजिक विचारवंत उपस्थित होते. तसेच, यावेळी माजी विभागप्रमुख डॉ.एस.एन.पवार, डॉ.जे. बी.आंबेकर, डॉ.आर.बी.पाटील यांचेसह सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी अणि संशोधक विद्यार्थी मोठयाप्रमाणावर उपस्थित होते.

# राजकीय लोकशाही आर्थिक, सामाजिक लोकशाहीवर अवलंबून

## डॉ. सुखदेव थोरात; विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजकीय लोकशाही ही आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीवर अवलंबून असते. समाजामधील गरिबांनाही लोकशाही प्रणालीमध्ये भाग घेण्यासाठी सध्याच्या प्रणालीमध्ये योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. परदेशांमध्ये असे बदल अवलंबिले जात आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. सुखदेव थोरात. शेजारी डॉ. गेल ऑम्वेट, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जगन कराडे आदी.**

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागामार्फत अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून रशियन सोशिओलॉजिकल सोसायटी, साऊथ आफ्रिकन सोशिओलॉजिकल सोसायटी, एशिया क्लायमेंट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया, इंटरनॅशनल सोशिऑलॉजीकल सोसायटी आणि इंडियन सोशिऑलॉजीकल सोसायटी यांच्या सहकार्याने आयोजित 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते.

भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डी. आर. साहू, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सामाजिकशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. थोरात म्हणाले, समाजामध्ये समानता मिळविण्याच्या प्रयत्नांमध्ये प्रत्येकास समान संधी आहे. त्यासाठी समान अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. समाजामध्ये निर्माण झालेली आर्थिक दरी कमी करण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत, यासाठी गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समाजाच्या प्रगतीमध्ये भरीव योगदान देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना, अध्यापन व संशोधनाच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. याप्रसंगी ज्येष्ठ संशोधक व मानवी हक्क कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्वेट, भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा डॉ. आर. इंदिरा व भारती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांनी मनोगत व्यक्त केले. समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. प्रतीक्षा मांगलेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. यावेळी माजी कुलगुरू डॉ. विद्युत जोशी, डॉ. हरी बाबू, हेमिक्सा राव, के. एल. शर्मा, डॉ. परमजित सिंग, डॉ. विजय खरे, डॉ. बी. के. नागला यांच्यासह इंडोनेशियायेथील डॉ.अहमद दिरवण, युफी ॲंडरॅनी, स्वित्झर्लंडमधील जॅडे ग्रेस व चार्ले टर्नर, फिलीपाईन्समधील अर्जेल मसंदा, साऊथ कोरियामधील जॉग, दक्षिण आफ्रिका येथील जयंथन गावेंडर, किरण ओढाव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2019
तरुण भारत

# विद्यापीठात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात

## जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज्, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने 'जागितक अपंग दिन' साजरा करण्यात आला. प्रमुख जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल व चेतना अपंगमती विकास संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष पवन खेबूडकर प्रमुख पाहुणे होते. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

मित्तल यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येत असलेल्या शासनाच्या विविध योजना व प्रकल्पाची माहिती दिली. पवन खेबूडकर यांनी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी यासंबंधी माहिती दिली. विद्यापीठ अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना व इतर क्षेत्रामध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : अपंग दिनानिमित्त कार्यक्रमाचे उद्घाटन करताना अमन मित्तल. सोबत प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, पवन खेबूडकर, डॉ. नमिता खोत, डॉ. आर. व्ही. गुरव आदी.**

प्रास्तविक संचालक समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या डॉ. नमिता खोत यांनी केले. युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज्च्या संचालक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. सहाय्यक संचालक सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे अविनाश भाले, यांनी आभार मानले. यावेळी डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, कुलसचिव, डॉ. आर. व्ही. गुरव, संचालक विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. मनोहर वासवानी, डॉ. लगरे,एन.एस.एस. समन्वयक, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, बॅ. बाळासाहेब खडरेकर ज्ञान स्त्रोत केंदातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ यूएस ग्लोबल रँकिंगमध्ये देशात १० व्या स्थानी

## मटेरियल्स सायन्समध्ये मोठे संशोधन; देशातील दुसरे विद्यापीठ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यूएस न्यूज एज्युकेशन रँकिंग्ज बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीज अंतर्गत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीत शिवाजी विद्यापीठाने मटेरियल्स सायन्सच्या संशोधनात देशात १० वा क्रमांक पटकाविला आहे. हे देशातील दुसरे अकृषी विद्यापीठ असून यामुळे कोल्हापूरचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे.

मटेरियल्स सायन्समधील संशोधनाची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी वेब सायन्स या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिका संग्रहाचा संदर्भ घेण्यात आला आहे. या मानांकनासाठी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मापन करणारी कार्यप्रणाली वापरण्यात आली. विद्यापीठाने मटेरियल्स सायन्स या विषयात २०१३ ते २०१७ या कालावधीत केलेले संशोधन गुणवत्ता, संशोधन पत्रिका याचे वापरलेले संदर्भ याचा जागतिक संशोधनावर झालेला



परिणाम या बाबींचा मानांकनासाठी विचार करण्यात आला आहे.

विद्यापीठातील भौतिक व रसायनशास्त्र व इतर विभागांनी केलेल्या संशोधनास जागतिक मान्यता मिळविली आहे. मटेरियल्स सायन्स विषयावर विद्यापीठात दोन दशकांपासून संशोधन सुरू आहे. यात सौर ऊर्जेवरील उपकरणे, ऊर्जा साठवणुकीसाठी लागणारे पदार्थ, विषारी वायूंचे प्रमाण तपासण्याच्या कार्यप्रणालीतील पदार्थ, नॅनो मटेरियल्स, नॅनो कोटिंग्ज यांचा समावेश आहे. संशोधनासाठी लागणारा निधी हा राष्ट्रीय शिखर संस्था व जागतिक दर्जाच्या प्रतिष्ठित शिष्यवृत्तीतून विद्यापीठास प्राप्त झाला आहे. यामुळे विद्यापीठात जागतिक दर्जाचे संशोधन करणे शक्य झाले आहे. विज्ञान अधिविभागांमध्ये आंतरराष्ट्रीय संशोधनपर आदान-प्रदान करणे व गुणवत्ता वाढीसाठी करार झाल्याने जागतिक पातळीवर हे यश प्राप्त झाले, अशी माहिती भौतिकशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

> शिवाजी विद्यापीठ सातत्याने संशोधन व गुणवत्ता वाढीसाठी प्रेरणा, प्रोत्साहन देऊन अर्थसहाय्य उपलब्ध करून देते. त्यामुळे विद्यापीठ संशोधनात प्रगती करीत आहे, याचे सर्व श्रेय विद्यापीठातील शिक्षकांना आहे. यूएस रँकिंगच्या क्रमवारीत बहुतांश संशोधन संस्था असून विद्यापीठ एकमेव आहे. यामुळे विद्यापीठ जागतिक पातळीवर पोहोचले आहे.
>
> - **डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# मटेरियल सायन्समध्ये शिवाजी विद्यापीठ देशात दहावे

## जागतिक पातळीवर संशोधनातील गुणवत्ता सिद्ध

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

यूएस न्युज एज्युकेशन रँकिंग बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटी अंतर्गत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीत शिवाजी विद्यापीठाला मटेरियल सायन्समध्ये देशात १० वा क्रमांक मिळाला आहे. विशेष म्हणजे या गुणवत्ता यादीमध्ये विद्यापीठ म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी व शिवाजी या दोनच विद्यापीठांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठाने पुन्हा एकदा जागतिक पातळीवर आपली संशोधनातील गुणवत्ता सिद्ध केली आहे.

ही गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी 'वेब ऑफ सायन्स' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिकेचा संदर्भ घेण्यात आला आहे. या मानांकनासाठी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मापन करणारी संस्था क्लॅरिवेट अनॉलिस्टिक इनसेटस् यांनी तयार केलेली कार्यप्रणाली वापरण्यात आली. यासाठी शिवाजी विद्यापीठामध्ये मटेरियल सायन्स या विषयात २०१३ ते २०१७ या कालावधीत केलेले संशोधन, गुणवत्ता, संशोधन पत्रिका, त्यांचे वापरलेले संदर्भ या संशोधनाचा जागतिक संशोधनावर झालेला सर्वंकष परिणाम इत्यादी बाबींचा विचार करण्यात आला.



### प्राध्यापकांची भरीव कामगिरी



मटेरियल सायन्स विषयामध्ये प्राध्यापकांनी केलेल्या संशोधनामुळे हे यश मिळाले आहे. विभागातील प्राध्यापकांनी भरीव अशी कामगिरी केली आहे. त्यामध्ये जागतिक दर्जाचे सामंजस्य करार, जागतिक प्रकल्प, विविध शिखर संस्थांनी दिलेला निधी यामधून जागतिक दर्जाची प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेत सध्या संशोधन चालते. जागतिक रँकिंगमुळे नवचैतन्य निर्माण झाले असून, या विषयात नवनवीन मापदंड निर्माण करण्याचा मनोदय आहे.

**- डॉ. पी. एस. पाटील, पदार्थविज्ञान विभागप्रमुख**

शिवाजी विद्यापीठामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व इतर अधिविभागांनी केलेल्या संशोधनास जागतिक मान्यता मिळाली आहे. या अधिविभागांमध्ये गेल्या २-३ दशकांपासून संशोधन कार्य सुरू आहे. मुख्यत्वेकरून सौरऊर्जेवर आधारित उपकरणे, ऊर्जा साठवणूक करण्यासाठी लागणारे पदार्थ, विषारी वायूंचे प्रमाण तपासणाऱ्या कार्यप्रणालीतील पदार्थ, होलोग्रॉफी, नॅनो मटेरियल्स व नॅनो कोटिंग्स इत्यादी विषयांचा समावेश आहे.

या संशोधनसाठी लागणारा निधी हा अधिविभागातील प्रध्यापकांनी विविध राष्ट्रीय शिखर संस्थांकडून प्रकल्प निधीद्वारे प्राप्त केला आहे. तसेच संशोधनाचा फायदा या अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना झाला असून, अनेक विद्यार्थ्यांना हम्बोल्ट (जर्मनी), मारी क्युरी (युरोप), जेएसपीएस (जपान), ▸▸ **पान ७ वर**

# मटेरियल सायन्समध्ये शिवाजी विद्यापीठ देशात दहावे

**(पान १ वरून)** ब्रेन पूल (दक्षिण कोरिया), रॅमन (अमेरिका), डीएडी (जर्मनी) आदी जागतिक दर्जाच्या प्रतिष्ठित शिष्यवृत्ती प्राप्त झाल्या आहेत.

**पहिल्या दहा संस्थांचे गुणांकन**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स - ५६.२, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ खरगपूर ४७.२, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे ४३.६, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास ४३.६, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली ४२, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर ३८.९, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रूरके ३२.३, बनारस हिंदू युनिव्हर्सिटी २९.४, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी वाराणसी २८.९, शिवाजी युनिव्हर्सिटी २८.५.

# विद्यापीठाचा मटेरियल सायन्स विभाग देशात दहावा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटी रँकिंगअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या मटेरियल सायन्स विभागाचा देशात दहावा क्रमांक आला आहे. यूएस न्यूज एज्युकेशन रँकिंगद्वारे ही क्रमवारी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली. या गुणवत्ता यादीत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी व शिवाजी विद्यापीठ या दोनच विद्यापीठांचा समावेश आहे.

## ग्लोबल युनिव्हर्सिटी रँकिंगअंतर्गत समावेश

ही गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी वेब ऑफ सायन्स या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिका संग्रहाचा संदर्भ देण्यात आला आहे. या मानांकनासाठी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मापन करणारी कार्यप्रणाली वापरण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये मटेरियल सायन्स या विषयात २०१३ ते २०१७ या कालावधीत केलेले संशोधन, गुणवत्ता, संशोधन पत्रिका, त्याबाबत वापरण्यात आलेले संदर्भ यांचा जागतिक संशोधनावर झालेला परिणाम यांचा विचार केला आहे.

शिवाजी विद्यापीठामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व इतर अधिविभागांनी केलेल्या संशोधनास या रँकद्वारे जागतिक मान्यता मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. या अधिविभागांमध्ये 'मटेरियल सायन्स' या विषयात गेल्या तीस वर्षांपासून संशोधन कार्य सुरू आहे. सौर ऊर्जेवर आधारीत उपकरणे, ऊर्जा साठवणूक करण्यासाठी लागणारी यंत्रणा, विषारी वायूंचे प्रमाण तपासण्यासाठी आवश्यक घटक, नॅनो मटेरियल व नॅनो कोटींग या विषयांचा समावेश आहे.

या संशोधनांसाठी आवश्यक असलेला निधी अधिविभागातील शिक्षकांनी विविध राष्ट्रीय शिखर संस्थांकडून प्रकल्प निधीद्वारे मिळवला आहे. या संशोधनाचा फायदा अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना झाला आहे. जर्मनी, युरोप, जपान, अमेरिका, येथील जागतिक दर्जाच्या शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी मटेरियल सायन्स विभागातील संशोधनाचा लाभ विद्यार्थ्यांना झाला आहे.

> शिवाजी विद्यापीठ संशोधनामध्ये गेल्या काही वर्षात अव्वल कामगिरी करत आहे. देशात दहाव्या स्थानावर मटेरियल सायन्स विभागाचे नाव कोरले जाणे ही विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. तसेच ज्या दोन विद्यापीठांना या रँकमध्ये स्थान मिळाले आहे त्यामध्ये एक शिवाजी विद्यापीठ आहे. या क्रमवारीतील स्थानाचा विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनासाठी प्रेरणा निर्माण करण्यात मोठा वाटा आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



> मटेरियल सायन्समध्ये सातत्याने होणाऱ्या संशोधनाचा व त्यातून समाजाला उपयुक्त ठरणाऱ्या निष्कर्षांचे हे यश आहे. विद्यापीठानेही मटेरियल सायन्समध्ये संशोधन करण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र यासह नॅनो सायन्समधील शिक्षक, विद्यार्थ्यांना पाठबळ दिले. देशाच्या क्रमवारीत दहावे स्थान मिळवण्यासाठी केलेल्या कष्टांचे चीज झाले.
>
> – डॉ. पी.एस पाटील, विभागप्रमुख, पदार्थविज्ञान विभाग

## 'नॉलेज शेअरिंग' संकल्पना मूर्त रूपात

मटेरियल सायन्समधील संशोधनामुळे गेल्या तीस वर्षांत समाजाच्या विकासाला हातभार लागला आहे. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र या विषयातील संशोधनाचा टक्का वाढल्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा देशातच नव्हे तर जगभरात लौकिक वाढला आहे. विद्यापीठाच्यावतीने करण्यात आलेल्या सामंजस्य करारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची जगभरातील अन्य विद्यापीठातील शैक्षणिक देवाणघेवाण वाढली आहे. यामुळे 'नॉलेज शेअरिंग' ही संकल्पना व्यापक स्वरूपात मूर्त रूपात येत आहे.

# ‘मटेरियल्स सायन्स’मध्ये विद्यापीठ देशात दहावे

## यूएस न्यूज एज्युकेशन रँकिंग जाहीर : ‘बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटी’मध्ये समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** यूएस न्यूज एज्युकेशन रँकिंगअंतर्गत बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटींची गुणवत्ता यादी ऑनलाईन जाहीर झाली. त्यात मटेरियल्स सायन्समध्ये (पदार्थ विज्ञानशास्त्र) शिवाजी विद्यापीठाने देशात दहावा क्रमांक पटकविला. ही गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी ‘वेब ऑफ सायन्स’ या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधनपत्रिका संग्रहाचा संदर्भ घेण्यात आला आहे.

या मानांकनासाठी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मापन करणाऱ्या क्लॅरिव्हेट ॲनॅलिटिक्स इनसाइट्स यांनी तयार केलेली कार्यप्रणाली वापरली आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाने मटेरियल्स सायन्समध्ये २०१३ ते १७ या काळात केलेले संशोधन, त्याची गुणवत्ता, त्यासाठी वापरलेले संदर्भ, आदींचा विचार केला आहे. विद्यापीठामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व इतर अधिविभागांनी केलेल्या संशोधनाला या मानांकनाद्वारे जागतिक मान्यता मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. या अधिविभागांनी मटेरियल्स सायन्य विषयात तीन दशकांपासून संशोधन कार्य सुरू केले आहे.

प्रामुख्याने सौरऊर्जेवर आधारित उपकरणे, ऊर्जा साठवणुकीसाठी लागणारे पदार्थ, विषारी वायूंचे प्रमाण तपासणाऱ्या कार्यप्रणालीतील पदार्थ, होलोग्राफी, आदी विषयांचा समावेश आहे. संशोधनासाठी लागणारा निधी हा अधिविभागांतील शिक्षकांनी राष्ट्रीय शिखर संस्थांकडून प्रकल्प निधीद्वारे प्राप्त केला आहे. या संशोधनाचा फायदा संशोधक विद्यार्थ्यांना झाला. अनेक विद्यार्थ्यांना हम्बोल्ट, मारीक्युरी, रामन, आदी शिष्यवृत्ती प्राप्त झाल्या आहेत.

दरम्यान, ‘मटेरियल्स सायन्स’ मधील संशोधनाची यापूर्वी २०११ मध्ये ‘करंट सायन्स’ या संशोधन पत्रिकेमध्ये लेखकाने दखल घेतली होती.

### मानांकनाबद्दल आनंद : डॉ. पी. एस. पाटील

आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांमध्ये मटेरियल्स सायन्सबाबत प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांची ‘वेब ऑफ सायन्स’कडून दखल घेतली जाते. मानांकनाबद्दल आनंद होत असल्याचे पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, अकृषी विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठ दुसऱ्या स्थानावर आहे. अद्ययावत प्रयोगशाळा व प्रशासनाच्या पाठबळामुळे जागतिक दर्जाचे संशोधन करणे शक्य होत आहे. अशा उपक्रमांसाठी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

> “संशोधनाला बळ देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ विविध योजना राबवीत आहे. त्याचे फलित म्हणून संशोधनात आघाडी घेत असल्याचे या मानांकनाद्वारे स्पष्ट होते. मटेरियल्स सायन्सबाबतच्या मानांकनामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकात भर पडली आहे.
>
> \- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

11 DEC 2019


तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्लोबल रँकींगमध्ये मटेरिअल सायन्स टॉप टेनमध्ये

## शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा : बेस्ट ग्लोबल युनिर्व्हसिटीची गुणवत्ता यादी जाहीर









### मटेरिअल सायन्सला जागतिक दर्जा

शिवाजी विद्यापीठातील मटेरीअल सायन्सची जागतिक दर्जाची ओळख निर्माण झाली आहे. या यशात विभागातील सर्व प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांचे योगदान आहे. तसेच पुढील नवीन संशोधन करण्यासाठी उत्साह निर्माण झाला आहे. तसेच भविष्यात नवनवीन यंत्रे तयार करून, औद्योगीक क्षेत्रात त्यांचा वापर करण्यासाठी उपयोगी पडेल. युएसए ग्लोबल रँकिंगमध्ये विद्यापीठाचे नाव आल्याने विद्यापीठाची मान उंचावली आहे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

युएस न्यूज एज्युकेशन रँकिंगअंतर्गत बेस्ट ग्लोबल युनिर्व्हसिटींची गुणवत्ता यादी ऑनलाईन जाहीर करण्यात आली. त्यामध्ये मटेरिअल सायन्स विभागामध्ये (पदार्थविज्ञानशास्त्र) शिवाजी विद्यापीठाने देशात दहावा क्रमांक पटकावला आहे. ही गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी वेब ऑफ सायन्स या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिका संग्रहाचा संदर्भ घेण्यात आला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

युएस न्यूज एज्युकेशन रँकिंगअंतर्गत बेस्ट ग्लोबल युनिर्व्हसिटी मानांकनासाठी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मापन करणाऱ्या क्लॅरिव्हेट ॲनॅलिटिक्स इनसाइट्स यांनी तयार केलेली कार्यप्रणाली वापरण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठातील मटेरियल्स सायन्समध्ये २०१३ ते २०१७ या कालावधीत केलेल्या संशोधन, त्याची गुणवत्ता, त्यासाठी वापरलेले संदर्भ, जागतिक संशोधनावर झालेले परिणाम, आदींचा विचार केला आहे. विद्यापीठातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि इतर अधिविभागांनी केलेल्या संशोधनाला या मानांकनाद्वारे जागतिक मान्यता मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेल्या तीन दशकापासून मटेरिअल सायन्य विषयात दर्जेदार संशोधन सुरु आहे. ऊर्जा साठवणूक करण्यासाठी लागणारे पदार्थ, विषारी वायूंचे प्रमाण तपासणाऱ्या कार्यप्रणालीतील पदार्थ, सौरऊर्जावर आधारित उपकरणे, होलोग्राफी, नॅनोमटेरियल्स, नॅनो कोटींग्स् आदी विषयात दर्जेदार संशोधन सुरू आहे. या संशोधनासाठी लागणारा निधी अधिविभागातील शिक्षकांनी विविध राष्ट्रीय शिखर संस्थांकडून प्रकल्पांद्वारे मिळवला आहे. या संशोधनाचा फायदा या अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना झाला आहे. या अधिविभागामध्ये असणाऱ्या अद्यावत प्रयोगशाळांमुळे आणि विद्यापीठ प्रशासनाच्या पाठबळामुळे जागतिक दर्जाचे संशोधन करणे शक्य होत आहे. अनेक विद्यार्थ्यांना हम्बोल्ट, मारीक्युरी, जेएसपीएस, ब्रेनपूल, रामन, आदी जागतिक दर्जाच्या शिष्यवृत्ती प्राप्त झाल्या आहेत.

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाने उद्या, गुरुवारी 'परिघाबाहेरील स्त्रिया' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्त कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. शारदाबाई पवार यांच्या जयंतीनिमित्त या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. त्यामध्ये विविध सत्रांत निशा शिवूरकर (संगमनेर), मीना शेषू (सांगली), साधना झाडबुके, सुशीला यादव, दीपा शिपूरकर (कोल्हापूर), पूर्णिमा चिकरमाने (पुणे) या परित्यक्ता स्त्रिया, देवदासी, वेश्या, कचरा गोळा करणाऱ्या, घरेलू कामगार स्त्रिया, आदी विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी मंगळवारी दिली.